जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १२९ दिनांक - २३/०२/२०२४**

युनिट-५, गुन्हे शाखा पुणे शहर

## दारु पिण्याचे पैशाकरीता घरफोडी चोरी करणा-या आरोपीस मुद्देमालसह घेतले ताब्यात

हडपसर पोलीस ठाणे हद्दीतील घावटे व्हिजन बिल्डींग घावटे वस्ती मांजरी ब्रु. पुणे येथे दि. १८/०२/२०२४ रोजी दिवसा फिर्यादीच्या घरातील लॅपटॉप व मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीचे इराद्याने चोरुन नेले बाबत हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा रजि.नं.३१३/२०२४, भा.दं.वि.कलम ४५४,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचे घटनास्थळी गुन्हे शाखा, युनिट-५ कडील पोलीस निरीक्षक विष्णु ताम्हाणे व स्टाफ यांनी भेट देऊन तपास चालु केला. तपासा दरम्यान पोलीस अंमलदार अमित कांबळे यांना त्यांचे बातमीदारांमार्फतीने बातमी मिळाली की,एक संशईत इसम याचेकडे चोरीचा लॅपटॉप व मोबाईल असुन तो विक्री करणेकामी के.के.घुले चौक,मांजरी,पुणे येथे संशयितरित्या वावरत आहे.

नमुद बातमीच्या अनुषंगाने मा.वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे मांजरी येथुन एक संशयित इसम नामे दिलीप कृष्णराव नाईक, वय ४७ वर्षे,रा.फ्लॅट नं २०३,विहार कॉम्प्लेक्स,म्हसोबा वस्ती,झेड कॉर्नर, मांजरी,पुणे यास त्याचेकडील ३०,५००/-रु.कि.चा लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप,लॅपटॉपबॅग व रेडमी कंपनीचा मोबाईल सह ताब्यात घेतले. त्याचेकडे केलेल्या तपासात त्याने दारु पिण्याकरीता पैसे पाहिजे म्हणुन लॅपटॉप व मोबाईल फोन चोरी करुन ते विक्री करीता आलो असल्याचे सांगितले.यावरुन हडपसर पोलीस ठाणे कडील गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील ३०,५००/-रु.कि.चा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे २ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनिट ५ गुन्हे शाखा श्री.विष्णु ताम्हाणे, पोलीस अंमलदार अमित कांबळे,दया शेगर,पल्लवी मोरे,स्वाती गावडे,पांडुरंग कांबळे यांनी केली आहे.


गुन्हेशाखा युनिट - ५, पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा युनिट-५, पुणे शहर